अमेरिकेतल्या गणेश चतुर्थीची धामधूम

- **अस्मिता मोडक** (शार्लट, नॉर्थ कॅरोलायना)

"तू सुखकर्ता, तू दुःखहर्ता, तूच कर्ता आणि करविता!" हे गाणं परवा ऐकलं. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिना आला, की याच कर्ता आणि करविता असलेल्या गणरायापुढे आपण नतमस्तक होतो. ज्या गजाननाने आपल्याला त्याची उपासना करता यावी म्हणून भारतासारख्या भूमीत जन्माला घातले आणि त्यानेच आपल्याला भारतापासून कित्येक कोस दूर असलेल्या अमेरिकेत आपली कर्मभूमी म्हणून आणून सोडले याबद्दल आपल्याला यादिवसात प्रकर्षाने वाईट वाटत राहते. गणेश चतुर्थी जवळ आल्यावर ही विचारांची धुमश्चक्री आपल्या मनात सुरू होते. आणि आता गणपती येणार, त्याआधी आपले अमेरिकेतले घर कसे आणि कुठून सजवायचे हा प्रश्न पडतो.

मोठं घर असो किंवा अपार्टमेंट असो, प्रत्येक बाबतीत आपण आपल्या मायदेशी जे काही करत असू तसेच घडवून आणायचा आटापिटा सुरू करतो. त्या जुन्या आठवणींना जपत एक छोटासा कोपरा शोधतो आणि गणपतीची स्थापना कुठे करता येईल हे ठरवू लागतो. मग ती जागा पूर्व-पश्चिम आहे ना, भिंतींना, कार्पेटला कुठेही धक्का पोहोचणार नाही ना, मुलांच्या हातापासून ती जागा सुरक्षित आहे ना असे अनेक "क्षुल्लक" पण स्वतःला पटणारे विचार करून, खात्री करूनच पुढची तयारी सुरू होते. इत्तर गोष्टी जमवता जमवता भारतासारखी इथे ऑफिसमधून सुट्टी मिळणार नाही, याची खंत वाटत असते. शक्यच असेल तर सुट्टी काढायचा प्रयत्न एक दोन महिन्यांपासून सुरू झालेला असतो. नाहीतर सकाळी पहाटे पूजा करून ऑफिसला जाणे नाहीतर त्या दिवशी घरूनच ऑफिसचा उरका पाडणे हा बेत पक्का असतो. गणपती आलेत म्हणजे काहीही अशक्य नाही, हे मन स्वतःला बजावत असते. त्यातूनच वाट काढत त्या मंगल दिवसासाठी, पूजेसाठी सगळी तयारी सुरू करतो. इंडियन स्टोरमध्ये तर आठवडाभरआधीपासून धुमाकूळ घातला जातो. नारळ मिळव ण्यापासून पूजेसाठी फुले, कापूर, उदबत्ती शोधण्याचा आपण खटाटोप सुरू करतो. कित्येकदा भारतातून आणलेले देवाचे, पूजेचे साहित्य असेल तर जीव भांड्यात पडतो, नाहीतर आई, सासू यांच्याकडून 'जे मिळेल' ते कसे चालवून घ्यायचे, याचे धडे आपल्याला मिळू लागतात. अमेरिकेत जिथेतिथे मुबलक दिसणारे गवत हे दुर्वा म्हणून वापरायचे, की नाही याचे त्या गवताप्रमाणे सूक्ष्म संशोधन आणि चर्चा सुरू होते.

मग उत्साहाच्या भरात हरतालिकेचा उपवास आपण करतो. तरीही सगळं लक्ष संध्याकाळी आरास कशी आणि कोणी करायची याकडे असते. आपल्याला हवी असलेली आरास करायची म्हंटली तर सगळं आपल्यावरच येईल याची भीती वाटत असते आणि मुलांना आपल्या बालपणीच्या भारतातील आरास करण्याबद्दलच्या गमती जमती सांगत असताना त्यांना त्यात काडीचाही रस नसतो. आम्हाला मदत करा असे सांगण्याआधीच ते यथायोग्य कारण देऊन पळ काढतात.

या सर्व धावपळीतून बाहेर पडून गणेश चतुर्थीचा दिवस उजाडतो. नवीन कपडे, दागदागिने घालून घरातला प्रत्येक जण सजला आहे ना, याची खात्री झाली, की पहिली पूजा लवकरात लवकर आटपून भारतातील नातेवाईकांच्या व्हिडिओकॉल मधूनच मोठ्यांना नमस्कार, लहानांना आशीर्वाद या प्रथेला नाईलाजाने आपलंसं करतो. अशातच मोदकांची आठवण येते. गणपती आणि मोदक हे समीकरण काही निराळेच! पण वर्षातून एकदा का होईना, उकडीचे मोदक करण्याचा मोह आपल्याला आवरत नाही. अर्थातच पुरेश्या सरावाअभावी ते मोदक कमी आणि लाडू जास्त दिसतात. तरीही त्याचे वाईट वाटून न घेता अनंत चतुर्दशीला वेळ काढून तळणीचे मोदक करण्याचा आपण घाट घालतो! संध्याकाळी आरतीच्या वेळी आपण मनोभावे आरती करत असतो. भारताप्रमाणे इथे आरतीच्या दुमदुमणाऱ्या आवाजाचा आपल्याला

आनंद अनुभवता येणार नाही, हे माहीत असूनही आजूबाजूच्या एखाद्या घरातून एखादी आरती ऐकायला मिळावी, म्हणून मनोमन प्रार्थना करत असतो. जमलेच तर देवळात, मराठी मंडळात आरतीला हजेरी लावायचीच हे मनोमन ठरवतो. त्यातच आलेली पाहुणे मंडळी, त्यांचा पाहुणचार यामध्ये आकंठ बुडून जातो. अश्यावेळी मुलांनी आपल्याला काहीतरी मदत करावी असे वाटते तर मुले मात्र त्यांच्या आलेल्या मित्रमंडळींबरोबर गप्पांमध्ये नाहीतर फोनमध्ये अडकलेली असतात. गणपतीचे दीड, पाच किंवा दहा दिवस पटकन सरतात आणि विसर्जनाच्यावेळी मात्र अगदी भारतात असताना जसे डोळे भरून यायचे तसेच पाणावतात! या आपल्या आवडत्या सणासाठी तयारीची माध्यमं जरी बदलली, तरी भारतात काय किंवा भारताबाहेर काय, गणरायाबद्दलची मनातील भावना थोडीच बदलणार आहेत?

***

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तररंग विभाग- सत्र अहवाल

निरोगी दात, निरोगी हास्य

अहवाल: **स्मिता कंटक** (विल्मिंग्टन, डेलावेअर)

व्याख्याते: **डॉ. माधवी काळुस्कर** (नॉर्थ ब्रुन्सवीक, न्यू जर्सी), डॉ. विकास बापट (ग्रीअर, साऊथ कॅरोलायना)

निरोगी दात हे सौंदर्याइतकेच आरोग्याचेही लक्षण आहे. आज माणसाच्या वाढत्या आयुर्मानाबरोबर दातांचे आरोग्यही दीर्घकाळ टिकवणे आवश्यक ठरले आहे. या सत्रात दोन दंतवैद्यांनी निरोगी दातांचे रहस्य उलगडून सांगितले.

डॉ. माधवी काळुस्कर यांनी सांगितले, की दात आणि हिरड्यांचे आजार काही प्रमाणात आनुवंशिक असतात. पण नियमित स्वच्छता आणि वर्षातून दोनदा तपासणी करून बरेचसे आजार टाळता येतात. दातांची स्वच्छता नीट झाली नाही, तर त्यांवर कीटणाचा थर जमतो. यातील बॅक्टेरिया आम्ल निर्माण करून दात व हिरड्यांची झीज करतात. हा कीटणाचा थर काढून टाकला, तर दंतरोगाचा धोका अतिशय कमी होतो. रोज दातांच्या सर्व बाजूंनी, मधल्या फटींतून स्वच्छता करणे आवश्यक आहे असे सांगून डॉ. काळुस्कर यांनी ब्रशचे निरनिराळे प्रकार, Floss, Implants, Bridge, Caps, Aligners, Whiteners अशा प्रकारच्या आधुनिक सुविधांची माहिती दिली.

सर्व प्रकारचे दंतरोग दिवसागणिक वाढत जातात, त्यामुळे वेळीच उपचार घेणे महत्त्वाचे आहे. लवंगाचे तेल, बेकिंग सोडा, पेरॉक्साईड सारखे उपाय फक्त काही प्रमाणात, तात्पुरते उपयोगी ठरतात. हिरड्यांच्या विकारांमुळे दीर्घकाळ सूज आली असेल, तर त्याचा परिणाम आरोग्यावर इतरत्र होऊ शकतो. त्यामुळे अशा विकारांचे निदान आणि उपचार तातडीने झाले पाहिजेत. आयुष्यातील निरनिराळ्या टप्प्यांवर दातांच्या आरोग्याची उद्दिष्टे बदलतात. प्रत्येक टप्प्यावर योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे, असे सांगून, आपल्या डेन्टल इन्शुरन्समध्ये किंवा मेडिकेअरमध्ये कोणते पर्याय उपलब्ध आहेत, याची माहिती करून घ्यावी, असा सल्ला डॉ. काळुस्कर यांनी दिला.

...

Cont. on next page....

शब्दांकन – **अजित नातू** (फोल्सम कॅलिफोर्निया)

डॉ. विकास बापट यांनी दंतविषयक आरोग्याच्या सत्राचे सूत्रसंचालन केले. व्याख्यानात आपल्या अनुभवांची भर घालत त्यांनी काही मोलाच्या सूचना दिल्या. दातांचे आरोग्य ही आयुष्यभर सांभाळण्याची जबाबदारी आहे. म्हणून मुलांना लहानपणापासून रोजच्या दिनक्रमात दातांची काळजी घेण्याची सवय लावावी, आहारातील साखरेचे प्रमाण कमी ठेवावे, असा सल्ला त्यांनी ऑनलाईन उपस्थितांना दिला.

सत्राच्या शेवटी दोन्ही व्याख्यात्यांनी प्रेक्षकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

***

उत्तररंग सत्र - प्रवासवर्णन व अनुभव

बृ. म. मंडळ उत्तररंग विभागाने आयोजित या आगळ्यावेगळ्या सत्रात चार व्यक्तींनी त्यांची प्रवासवर्णने व त्यातील अनुभव सादर केले. प्रत्येकाचे वैशिष्ट्य वेगळे व लक्षात राहण्यासारखे होते. ते सगळे ऐकून शब्दात बांधण्याचा खालील प्रयत्न.

१. "गोरीला ट्रॅकिंग इन रवांडा", मंगोलिया, सैबेरीयन रेल्वेप्रवास - मोहन दुर्वे

प्रथम वक्ते होते श्री. मोहन दुर्वे. यांचे दादर मुंबईमध्ये लहानपण गेले. नंतर प्रवासाची आवड निर्माण झाली व तो एक त्यांचा छंदच झाला. म्हणजे बघा, त्यांनी सगळ्या सात खंडांना भेट दिली आहे, २०० च्यावर देश पाहिले, अमेरिकेतील ५० ही राज्यांमध्ये प्रवास, सगळ्या स्टेट्स् पार्क्स्ना भेट, कॅनडामधील सगळे प्रदेश, यूरोपमधील बहुतेक देश (फक्त एक सोडून), कमाल म्हणजे भारतात सगळ्या राज्यांची सैर, आफ्रिकेतील बऱ्याच देशांना भेट, अबब, काय हा प्रवास! केव्हढे तास, केव्हढे परिश्रम, धन्य मोहनजी! आवड, छंद असल्याशिवाय असे होऊच शकत नाही. मला गंमतीने म्हणावेसे वाटते "गेला मोहन कुणी कडे"!

या सत्रात मोहनने, "गोरीला ट्रॅकिंग इन रवांडा" आणि मंगोलिया देश सफर असे दोन अनुभव कथन केले. "गोरीला ट्रॅकिंग इन रवांडा"तील मुख्य पाच भाग असे होते – १. पार्श्वभूमी, २. गोरीला चिंताजनक संख्या, ३. त्यांना न मारणे, ४. त्यांची संख्येत वाढ कशी करणे, ५. त्यांचे मानवीकरण न करणे (जंगलातच राहू देणे). त्यांना शोधून, त्यांची माहिती काढणे कठीण होते – एकतर दहाहजार फूट उंचीवर प्रवास – म्हणजे जिथे प्राणवायू कमी असतो, श्वास लागतो, ९-९ तास जंगलातून चालणे, खूप चढउतार, घनदाट जंगल, खूप तापमान, असा प्रवास करून किगिली गावात मोहन आले. तिथे त्यांनी museum of genocide इथे भेट दिली. गोरीला बघायला त्यांना पुढील काळजी घ्यायला लागली ती अशी; Act responsibly, be in crouch position while watching, no smoking, drinking or eating, quiet and no sudden moves, no flash photography, never touch, no direct stare with Gorilla. त्याप्राण्यांमध्ये शक्तिवान नर नेता असतो, सिल्वर बॅक व खाली जमिनीवर बसून सगळे शांतपणे बघत असतो, कळपात असणाऱ्या आया छोटयांचे संगोपन करत असतात.

नंतर मोहनने ट्रान्स-सायबेरियन रेल्वेमधील प्रवासाची माहिती दिली. जुलै-ऑगस्ट महिने तिथे जाण्यायोग्य, ६१५२ मैलांचा ७ दिवस रेल्वेप्रवास, एकंदर ११ दिवस असा प्रवास ज्याचा खर्च तीन प्रकारचा – suit क्लास ($२२,५००), गोल्ड क्लास ($१४३००), सिल्वर क्लास ($१२०००). अर्थात त्यांच्या प्रवासावेळीचे हे आकडे. लेक बाईकल मात्र विशेष बघण्यासारखे आहे. ह्या प्रवासात मॉस्को, रेड स्क्वेर, बसील चर्च, क्रेमलीन, सबवे हे नक्की बघा, असा सल्ला मोहनने दिला. मग मंगोलिया भेट ज्यात 'ऊलानउडे' हे राजधानी शहर, ज्याची लोकसंख्या ४०० हजार असून, १६६८ मध्ये स्थापन झाले. मोहनने मंगोलियात 'गर' ज्याला म्हणतात त्या गोलाकार टेंट मध्ये कसे ते राहिले, चेंगीजखान जिथे राहिला ते शहर, मंगोलियन घोडे, गोबी नावाचे डेझर्ट, ८० मिल्यन जुने अश्म (Fossils) यांचे वर्णन केले. तसेच 'नदाम' नावाची खेळस्पर्धा, ज्यात १००० घोडे भाग घेतात, यांची माहिती दिली. शेवटी रशियाला भेट द्यायला ट्रॅव्हल कंपनीतूनच जा, असा मोलाचा सल्ला दिला कारण कायदे, व्हिसा वगैरे सोपस्कार बरेच असतात. मोहन यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून प्रवासाचे आयोजन करण्यास मदत व माहिती मिळू शकेल. अशा जगाप्रवासी मोहनचे खूप आभार!

२ . कैलास पर्वत आणि मानस सरोवर दर्शन – संध्या देशपांडे

संध्या देशपांडे यांनी 'मानस सरोवर व कैलास पर्वत' यांची माहिती दिली. संध्याताई मूळच्या नागपूरच्या असून अमेरिकेत ओहायोमध्ये सध्या राहतात. त्यांना साहित्य, बागकाम आणि अर्थातच प्रवासाची आवड आहे. समुद्रमंथनात 'मेरू' पर्वताचा उपयोग केला त्याचा राहिलेला भाग म्हणजे कैलास पर्वत. इथे अर्थातच श्रीशंकर व पार्वती यांचे निवासस्थान आहे असे हिंदू धर्मात मानले जाते, म्हणूनच पवित्र अशी ही भेट आहे. तसेच इथे भेट देताना मन आपोआप आध्यात्मिक होते असे संध्याताई म्हणतात. कैलास पर्वत हे एक देऊळ आहे त्यामुळे त्याला प्रदक्षिणा भक्तिभावाने घालावी. ही, टूर नसून, एक भक्तियात्रा आहे असे समजा, मग प्रसन्न प्रवास होईल. गंमत म्हणजे ही यात्राआठ आकड्याच्या आकृतीप्रमाणे करायची असते, ज्यात भारत, नेपाळ, चीन तसेच कैलास व मानस सरोवर हेदेखील होतात. तिन्ही देशाचे व्हिसा लागतात. खूप उंचीवर प्रदेश असल्यामुळे हवेचा तुटवडा, दम लागणे असे प्रकार होतात त्यामुळे प्रवास सुरू करायच्या आधी काही महिने व्यायाम करावा. एका प्रवासी गाडीत पाचजण पण त्यांचे सामान वेगळ्या बसमध्ये असणे असा नियम आहे. तंबूमध्ये रहावे लागते, तसेच सहप्रवासीबरोबर मैत्री व मिळवून घ्यायची वृत्ती आवश्यक. प्रयाग गावात देवाला मागणे घालायचे व मग विष्णु-सरोवर, हनुमान-सरोवर, व शेवटी मानस-सरोवर बघावा. मानस सरोवर खूप उंचीवर असले तरी गोडे पाणी पवित्र आहे व एकंदर १५८ चौरस मैल क्षेत्रफळ आहे. इथे कीटक, प्राणी अजिबात नाही पण काही पक्षी आढळतात. नंतर 'मृत्यूद्वार' हे त्यांनी बघितले. त्या दरवाज्यातून बाहेर येताच, समोर रम्य, मनस्वी कैलास पर्वत दिसतो व ऊर भरून येतो, असे संध्याताई म्हणतात. पवित्र गंगा, यमुना या महान नद्या कैलास पर्वतातून उगम पावतात. म्हणून हिंदूचे हे भक्तीचे, यात्रेचे ठिकाण आहे. एक विशेष म्हणजे कैलास पर्वताच्या उंच टोकाला अजून कोणीही जाऊ शकले नाही. दमायला खूप होते तेंव्हा कापूरचा वास घ्यावा असे त्यांनी सांगितले. नंतर त्यांनी ओम पर्वताला भेट दिली. याचे दर्शन फक्त खूप वारा असल्यास होते, कारण मग त्यामुळे घनदाट ढग बाजूला होतात. कैलास पर्वताचे विलोभनीय दर्शन त्यांनी फोटो द्वारे दाखविले. संध्याताई म्हणतात, की कैलास पर्वत सुंदर चित्रासारखा पण वास्तवातही प्रत्यक्ष तसाच दिसतो.. त्या भावनिक होऊन म्हणतात, की मनाच्या अंतरात नेणारा हा प्रवास आहे, हा प्रवास झाल्यावर, कैलास पर्वतासारखे स्थितप्रज्ञ जगावे, असे आपोआप वाटू लागते. जरी तो प्रवास संपला तरी एक आंतरिक विचार करायला लावणारा प्रवास सुरू झाला असे मनाला भिडणारे संध्याताई बोलून जातात.

संध्याताईनी त्यांच्या साहित्यिक व ओजस्वी भाषेत खूप छान माहिती दिली व ते ऐकतानाच भावभक्तिची प्रचिती आली. त्यांचे खूप आभार!

३ . **क्युबा भेट – प्रकाश नवरे**

प्रकाश नवरे यांनी त्यांच्या क्युबा देशाच्या भेटीबद्दल सांगितले. ते म्हणतात, नुसता प्रवासासाठी प्रवास नको पण प्रत्येक अनुभव अंगी मुरवा, मजा घ्या. क्युबा देशाला ते संबोधतात 'A country frozen in time'. कारण बऱ्याच ठिकाणी ५०-१०० वर्षे जुने, जुनाट वसाहतवादी वातावरण व समाजजीवन बघायला मिळते. जणू पुरातन काळात गेल्यासारखे वाटते, सर्वत्र जुन्या गाड्या दिसतात. जरी हा देश गरीब असला तरी आकर्षक देश आहे व लोक मित्रवत वागतात. देश खूप सुरक्षित आहे. व्हिसा मिळायला खूप सोपं, तरीपण ट्रॅव्हल कंपनीतर्फे भेट आयोजित करावी असे प्रकाश सांगतात.

देशाची राजधानी आहे 'हवाना' शहर. ह्यात जुने ऐतिहासिक व नवीन –आधुनिक असे भाग आहेत. येथील Plaza Vieja मध्ये ११५ उंच टॉवर्स आहेत. तेथून ३६० अंश कोनात शहराचा पॅनोरमा-दर्शन होते. १९२६ साली बांधलेल्या ह्या टॉवरला बांधायला तीन वर्षे लागली व त्यावेळी $17 मिलियन (१ कोटी ७० लाख) खर्च आला.

नंतर प्रकाश यांनी ग्रँड थिएटरला भेट दिली. हे थिएटर १८३७ मध्ये बांधले व १९४० साली पुन्हा त्याची दुरुस्ती केली. इंग्लिश कवि हेमिंग्वे या देशात बरेच वर्षे राहिला कारण हा देशच आकर्षक आहे. Havana Malecon हा पाच मैलाचा पट्टा, मुंबईच्या मरीन ड्राइव पट्याची आठवण करून देतो. क्युबा म्हंटले, की सिगार संदर्भ अर्थातच आला. सिगार फॅक्टरी बघण्यासारखी आहे. हाताने सिगारपान कसे वळविले जाते ते बघण्यासारखे आहे.

विशेष म्हणजे क्युबा हा देश १००% साक्षर देश आहे. एक आठवडा तरी ह्या पर्यटनाला द्यावा, म्हणजे येथील अंतर्गत खरे अनुभव घेता येतील. तिथे मिळणारा उसाचा रस भारताची आठवण करून देतो. साधारण $११०० मध्ये ही सफर होऊ शकते., तिथे गरीबी आहे, पण माणसाच्या चेहऱ्यावर जो आनंद आहे तो खरा आहे, मनस्वी आहे.

क्युबन माणूस सुखी वाटतो व लोकजीवन सुरळीत चालले आहे. मग माणसालातरी दुसरे काय हवे असते! प्रकाशने दिलेल्या आगळ्या वेगळ्या माहितीबद्दल धन्यवाद. त्यांच्या याप्रवासवर्णनामुळे, अमेरिकेपासून फक्त ९० मैल लांब असलेल्या, क्युबा देशाला भेट देण्याचा, उत्तररंगीय बेत आहे, असे या सत्राच्या शेवटी आपल्यातील बरेचजण म्हणत होते.

४. **कुंभमेळा – संदीप दिक्षित**

संदीप दिक्षित यांनी त्यांची कुंभमेळा ही भेट कशी अचानक ठरली आणि कसे छान अनुभव आले ते व्हिडीओद्वारे कथन केले. संदीपचा एक मित्र सहज त्याला विचारतो, येतोस का आणि काही दिवसातच हा प्रवास घडतो, जणू ते नशीबात लिहिले होते व म्हणूनच जणू हा छान योग जुळून आला, असेच म्हणायला हवे.

फेब्रुवारी २८ ते मार्च ५, २०१९ अशी ही सफर झाली. खूप जणांना माहीत असेल, की अमृतमंथन चालू असताना अमृताचे काही पवित्र थेंब प्रयाग, हरिद्वार, नाशिक, व उज्जैन इथे पडले. त्यामुळे ही ठिकाणे पवित्र तीर्थस्थाने बनली. ५ कोटी (५० मिलियन) माणसे एका दिवशी, ९ फेब्रुवरी २०२१, प्रयागमध्ये कुंभमेळा निमित्ताने आली होती, व एकंदर २५० मिलियन लोक त्या ८-१० दिवसात तिथे जमले होते. हे आकडे अचंबित करणारे आहेत. नक्की यामुळे गडबड, प्रचंड गोंधळ, घाण, वास, आजार असणार असे साहजिकच मनात येते, पण संदीप म्हणतो, की तसे काहीही नव्हते. उलट चोख व्यवस्था, योग्य स्वच्छता (sanitization), सहज प्रवास, उत्तम अन्नव्यवस्था, व मुख्य म्हणजे कमालीची स्वच्छता त्याने अनुभवली. संदीपने ते वर्णन सत्रामध्ये नुसते बोलून दाखवले नाही तर प्रत्यक्ष चित्रित केलेल्या व्हिडीओमुळे तसे आम्हाला बघतापण आले. भारत खूप सुधारला आहे हे ऐकून, बघून बरे वाटले हे नक्की.

प्रयागला मूर्ती, पुतळे (देवांचे) खूप आहेत, खूप विद्यार्थी, साधू, व्यापारी, कुंभमेळयासाठी आलेले होते. हिंदूंना गंगास्नान म्हणजे पर्वणी संदीपने ती, स्वतः अनुभवली. ४ मार्च २०२१ रोजी भल्या पहाटे ४ वाजता, संदीपने गंगेत पवित्र स्नान केले. त्याची व्हिडीओ क्लिप आम्ही सेशनमध्ये बघितली. तसेच तंदूरी चहाचा अनुभव त्याने छान वर्णन केला व क्लिपपण दाखवली. मुख्य म्हणजे, प्रसारमाध्यमांतून (चुकीचा) प्रचार स्वच्छगंगा बाबत दाखवतात, त्याच्या विरुद्धचा पण एक चांगला अनुभव त्याने सांगितला व तो म्हणजे गंगेचे पाणी व पात्र खूप स्वछ होते हे व्हिडीओ द्वारे दाखविले. पुन्हा एकदा भारताच्या प्रगतीबद्दल अभिमान व चांगले वाटले. संदीपने त्याच्या ह्या भेटीचे नाव ठेवले आहे ते म्हणजे 'largest human gathering in the world"; संदीपने त्याचा हा मस्त, भावनिक, व मनाला भारताबद्दल चांगले वाटेल असा अनुभव व प्रवासवर्णन बऱ्याच व्हिडीओ क्लिप वापरून कथन केले, त्याबद्दल त्याचे खूप आभार!

हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल उत्तररंग समितीचे व त्यातही स्पीकर टीम चे विशेष आभार! पुन्हा एकदा चारही वक्ते वेळ काढून आले व त्यांनी त्यांच्या प्रवासाचे छान अनुभव सांगितले, खूप प्रश्नांना उत्तरे दिली व मुख्य म्हणजे प्रेक्षकांना माहिती व प्रवास करण्याबद्दल प्रोत्साहित केले, त्याबद्दल या चारही जणांचे उत्तररंग समितीतर्फे मनःपूर्वक आभार व धन्यवाद!

***

Kids Section: Game: CATCH 3

- **Rajiv Tambe** (Pune)

Material:

9 balloons

1 sketch pen or ballpoint pen

Get Ready to Play:

This game requires a minimum of 2 players but there is no restriction on the maximum number.

Now, three players are playing this game.

Give 3 balloons each to all 3 players.

Each player should inflate all his balloons and make a different sign on each. For example, a star on one, a straight line on the second, a circle or square on the third, and so on.

Let's Play:

Hold the 3 balloons lightly in both hands. Throw one balloon into the air. When the balloon which has been thrown into the air starts coming down, throw the balloon in your left hand up in the air, and catch the descending balloon in your left hand.

Now when the balloon in the air starts coming down, throw the balloon in your right hand up in the air and catch the descending balloon in your right hand.

Turn by turn all three balloons will keep moving from hand to air to hand. At any given time at least one balloon should be in the air.

How high should you throw the third balloon and how much should the balloon have descended before you throw the balloon in your hand? This needs perfect timing.

Since you have to change the hand while caching the balloon, you need to throw the balloon at a slight angle, rather than straight. The skill required for this game is to adjust one's hands, and guess the speed of the balloons in order to catch them.

The big challenge of this game is to bring together speed, perfect timing and agility.

RULES:

- A player is out if he pushes the balloon which has been thrown in the air
- If any of the balloons of a player falls on the ground, that player is out
- If there are 3 balloons in two hands, that player is out

WHO WILL WIN?

The player who follows all the rules and plays for a maximum amount of time, is the winner.

SOME MORE FUN:

This fun is also with 3 balloons. But while catching the balloon you have to fold one leg, and standing on one leg you have to catch the balloon.

You may have to jump this way and that way and maybe even play hopscotch or do the 'lungi' dance to catch the balloon now!

So get set...!

***